# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ ९३७७ /२०१८,

पुणे शहर, दिनांक- .०९.२०१८.

**विषय :- अथर्वशीर्ष पठणानिमित्त वाहतूक व्यवस्थेत करण्यात आलेल्या बदलाबाबत...**

दिनांक- १४/०९/२०१८ रोजी पहाटे ०५.०० वाजेपासून श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंडळाच्या समोर श्रीमंत दगडूशेठ हलवाई गपणती मंडळ यांच्या संयोजनाखाली अथर्वशीर्ष पठणाचा धार्मिक कार्यक्रम होत आहे कार्यक्रमासाठी हजारो महिला भाविक सहभागी होत असतात त्याकरीता सदर कार्यक्रम दरम्यान वाहतूकीची कोंडी टाळणेसाठी व वाहतूक सुरळीत सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, तेजस्वी सातपुते,पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन दिनांक- १४/०९/२०१८ रोजी पहाटे ०५.०० वाजे पासून ते अथर्वशीर्ष पठणाचा धार्मिक कार्यक्रम संपेपर्यंत वाहतुकीचे बदला बाबत खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**अ) वाहतूक व्यवस्था :-**

❖ खालील नमूद रस्त्यांवर सर्व प्रकारची वाहने जाणे-येणेसाठी बंद करणेत येत आहे.

३. शिवाजी रोड : जिजामाता चौक ते रामेश्वर मंदिर चौक,

**पर्यायी मार्ग-** गाडगीळ पुतळा-जिजामाताचौक डावीकडे वळून गणेश रोडने फडके हौदचौक,देवजीबाबा चौक उजवीकडे वळून हमजेखान चौक सरळ महाराणाप्रताप मार्गावरुन गोविंद हलवाई चौक उजवीकडे वळून गोटीराम भैया चौक डवीकडे वळून शिवाजीरोडने स्वारगेटकडे

४. आप्पा बळवंत चौक ते बुधवार चौक

**पर्यायी मार्ग-** अप्पा बळवंत चौक डावीकडे वळून बाजीराव रोडने फुटका बुरूज मार्गे गाडगीळ पुतळा चौक उजवीकडे वळून जिजामाता चौक नंतर वरीलप्रमाणे.

❖ तसेच **लक्ष्मीरोडवर विजय मारुती चौक / सोन्या मारुती चौकापासून आवश्यकतेनुसार वाहतूक वळविली जाईल.**

**पर्यायी मार्ग-** सोन्यामारुती चौकाकडून डावीकडे वळून सुभानशहादर्गा उजवीकडे वळून गोटीराम भैया चौक मंडईमार्गे शनिपार चौकमधून इच्छीत स्थळी.

तरी नागरिकांनी वरील प्रमाणे वाहतूक व्यवस्थेतील बदल अंमलात आणून वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे, ही विनंती.